महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर

## राज्यशास्त्र विभाग

## ‘राष्ट्रीय ग्राहक दिन’

## अहवाल (गुरुवार, 20 डिसेंबर 2025)

आज गुरुवार, 20 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 09:00 वा. राज्यशास्त्र विभागात (F. 23) राष्ट्रीय ग्राहक दिनाचे औचित्य साधून ‘ग्राहकांचे हक्क व कर्तव्य’ या विषयावर राज्यशास्त्र विभागाच्या वतीने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक राज्यशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. अंगद पाटील यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे वाणिज्य विभागाचे प्रा. संदीप पाटील होते. आपल्या व्याख्यानात प्रा. संदीप पाटील यांनी ग्राहकाचे हक्क आणि कर्तव्ये कोणती? त्यासाठी शासनाने कोणते कायदे केलेले आहेत, ग्राहकांनी आपल्या तक्रारींच्या निवारणासाठी कोणाकडे आणि कोणत्या माध्यमातून गेले पाहिजे व आपली फसवणूक होण्यापासून आपले संरक्षण केले पाहिजे याविषयी विस्ताराने मार्गदर्शन केले. ग्राहकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी ग्राहक न्यायालयाची तरतूद करण्यात आलेली आहे असे प्रतिपादन करून त्यांनी न्यायालयात दाखल करावयाची तक्रार, तेथील कार्यपद्धती आणि मिळणारी भरपाई याविषयी विस्ताराने मांडणी केली. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी कॉलेजमधील राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. संतोष खडसे होते. या व्याख्यानासाठी हिंदी विभागाचे प्रा. जावेद शेख तसेच कॉलेजमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार राज्यशास्त्र विभागाचे प्रा. अंगद पाटील यांनी व्यक्त केले. या उपक्रमाचे सूत्रसंचालन कु. अंकिता इंगळे या बी. ए. भाग तीनमधील विद्यार्थिनीने केले.

HEAD
Department of Political Science
Karmaveer Bhaurao Patil College
Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli (M.S.)

PRINCIPAL
Karmaveer Bhaurao Patil College
Urun-Islampur, Dist. Sangli. 415 409




राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. संदीप पाटील आणि उपस्थित मान्यवर व विद्यार्थी



राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना डॉ. संतोष खडसे